## नियमीत दिवाणी दावा क्र.३०७/२०२१
## अर्ज निशाणी–६४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील जबाब वाचला. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद श्रवण केला.

३. प्रस्तुत अर्जान्वये प्रस्तुत दाव्यात वादी यांचे म्हणणे थोडक्यात असे की, प्रतिवादी क्र.१६ यांना दाव्याचे समन्स (निशाणी–३७) व मनाई अर्जाचे नोटीस (निशाणी–३८) पाठविण्यात आले होते, परंतु बेलिफ रिपोर्ट पाहता संबंधित प्रतिवादी क्र.१६ यांनी त्यांचे दाव्याचे सरनाम्यात नमूद केलेले नाव चुकीचे असल्याचे कारणास्तव उपरोक्त समन्स आणि नोटीस घेण्याचे टाळले होते. निशाणी–३७ व ३८ वरील बेलिफ रिपोर्ट पाहता प्रतिवादी क्र.१६ यांनी त्यांचे दाव्यामध्ये नमूद नाव **सौ. जिजाबाई नामदेव येवले** हे चुकीचे असून त्यांचे वास्तवातील नाव **सौ. जिजाबाई ज्ञानदेव येवले** असल्याचे नमूद सदरचे नाव दुरुस्त झाल्यास समन्स व नोटीसचा स्विकार करेन असे नमुद केलेले आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी म्हणणे म्हणणे दाखल केले असून अर्जास विरोध दर्शविला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले असता सदर दावा ठराव, निरंतरची मनाई ताकीद, कायदेशीर वाटपासाठी व ताब्यासाठी दाखल केलेले आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात अथवा मागणीत कोणताही बदल संभवत नाही. तसेच दुरुस्ती मंजूर केल्यास अभय पक्षातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करणे सोयीचे होईल. त्यामुळे प्रस्तावित

दुरूस्ती मंजूर करणे न्यायोजित होईल. कारणे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

**<u>आदेश</u>**

१. निशाणी–६४ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादींनी दाव्यात विहीत मुदतीत दुरुस्ती करावी.

Digitally signed by MAHESH SUNILDATT BHARAD
Date: 2022.09.02 14:01:07 +0530

सासवड.

दिनांक : ०१/०९/२०२२.

**(श्री. एम. एस. भरड)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.

## CERTIFICATE

“I affirms that the contents of this P.D.F. file are same word for word as per original”

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. M. S. Bharad, |
| | | 2nd Jt. C.J.J.D., Saswad, Pune |
| Name of Steno | : | Shri. P. B. Jadhav. |
| Date of Order | : | 01/09/2022. |
| Order signed by P. O. on | : | 01/09/2022. |
| Order uploaded on | : | 02/09/2022. |